विषय / लष्करी छावण्यालगतच्या अथवा
भोवतालच्या मोकळ्या जमिनीस
अकृषिक परवानगी/ना हरकत प्रमाणपत्र
प्रदान न करणेबाबत -----

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
क्रमांक: एनएए १०८६/५६९/सीआर-८८/ल-२
दिनांक : २४/१०/१९८६.

परिपत्रक

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४४ अन्वये अकृषिक प्रयोजनासाठी शेत जमीन वर्ग करण्याकरिता विहीत नमूना अर्जाद्वारे संबंधिताना जिल्हाधिका-यांकडे परवानगीसाठी अर्ज करावा लागतो. अशा प्राप्त झालेल्या अर्जाबाबत, संबंधित अधिका-यांमार्फत त्या प्रकरणी चौकशी-नंतर व नियमांस अधीन राहून काही अटी आणि शर्तीवर जिल्हाधिकारी अकृषिक परवानगी देतात. तथापि शासकीय योजनांसाठी किंवा सार्वजनिक आरोग्य अथवा सुरक्षितता आणि सुखसोयीच्या दृष्टीकोनातून अशी अकृषिक परवानगी देता येणे शक्य नसते. अशा प्रसंगी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४४ [२] [क] प्रमाणे संबंधिताना लेखी कारणे देऊन जिल्हाधिकारी परवानगी नाकारु शकतात.

लष्करी छावण्यालगतच्या किंवा भोवतालच्या परिसरातील मोकळ्या कृषिक जमिनीबाबत संबंधित जमीनधारकाकडून अकृषिक परवानगी मिळवून लहानलहान भूखंड पाडण्यात येतात, व बांधकाम करून त्या जमिनीचा निवासी प्रयोजनांसाठी वापर केला जातो.

लष्करी छावण्या भोवतालच्या लगतच्या क्षेत्रामध्ये सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने तसेच संरक्षण करण्याचे दृष्टीने विविध प्रयोजनांसाठी या जमिनी लागण्याची शक्यता असते. याबाबत लष्करी अधिका-यांनी केलेल्या शिफारशी विचारात घेऊन व उपरोल्लेखित तरतुदीच्या अधीन राहून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, राज्यात असणा-या लष्करी छावण्याभोवतालच्या व लगतच्या जमिनीबाबत लष्करी प्राधिकरण अथवा संरक्षण मंत्रालय भारत यांच्याशी सल्लामसलत केल्याशिवाय संबंधित जमीनधारकास अकृषिक वापरासाठी अकृषिक परवानगी देण्याची संबंधित महसूल अधिका-यांनी कार्यवाही करु नये या आदेशाचे दक्षतापूर्वक अनुपालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

धिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
1 OCT 1986